**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. ३२० कडील अर्जावर आदेश</u>**

अर्ज वाचला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. २ब (ड) हा काल दि. २४/११/२०२५ रोजी या कामी वकीलामार्फत हजर झाला आहे. सदर प्रतिवादीला लेखी कैफीयत दाखल करण्यास शेवटची संधी म्हणून मुदत देण्यात आली आहे. मुळ प्रतिवादी क्र. २ब यांनी यापुर्वी निशाणी क्र. १८९ कडे त्यांची लेखी कैफीयत दाखल केली आहे ही बाब विचारात घेता व तसेच प्रस्तुतचा दावा ५० वर्षांपेक्षा जुना आहे ही बाब विचारात घेता माझ्या मते अर्जातील कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज समर्थनीय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.11.25 15:40:53 +0530

दिनांकः- २५/११/२०२५ (पां. लिं. घुले)

ठिकाणः- कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.